**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२९/०७/२०२६

***ऐतिहासिक जंजिरे वसई किल्ला व परिसरात वसई-विरार महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम***

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जंजिरे वसई किल्ला व परिसरात महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून संपूर्ण किल्ला परिसर स्वच्छ, सुंदर व पर्यटकांसाठी अधिक आकर्षक करण्याचे काम सुरू आहे.

ऐतिहासिक जंजिरे वसई किल्ला हा राज्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक पर्यटनस्थळांपैकी एक असून येथे दररोज स्थानिकांसह राज्यातील तसेच देश-विदेशातील मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. किल्ल्यातील प्राचीन वास्तू, तटबंदी, मंदिरे, चर्च आणि अन्य ऐतिहासिक अवशेष हे वसईच्या समृद्ध इतिहासाचे प्रतीक आहेत. सदर वास्तू व परिसर हे मराठा इतिहास, पोर्तुगीज स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वारसाचे प्रतीक आहेत. या ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. मा.महापौर श्री.अजीव पाटील व मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी. पी. (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर वसई किल्ला व परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून महानगरपालिकेच्या स्वच्छता दूतांमार्फत नियोजनबद्ध पद्धतीने साफसफाईची कामे करण्यात येत आहेत. या मोहिमेअंतर्गत किल्ल्याच्या तटबंदीवर, बुरुजांवर तसेच मोकळ्या जागांमध्ये उगवलेले गवत, झुडपे व काटेरी वनस्पती काढणे, प्लास्टिक व इतर साचलेला कचरा उचलणे, पालापाचोळा व इतर घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे, पायवाटा व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करणे आदी कामे करण्यात येत आहेत. सदरील स्वच्छतेची कामे किल्ल्याच्या व किल्ला परिसरातील पुरातत्वीय रचनेला, बांधकामाला कोणताही धक्का न लावता करण्यात येत आहेत.

तसेच किल्ला परिसरातील ऐतिहासिक महत्त्व असलेल्या मंदिर, चर्च तसेच इतर वारसा स्थळांची व परिसराची विशेष स्वच्छता करण्यात येत असून पर्यटकांना स्वच्छ व निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव मिळावा यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका शहरातील ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांची स्वच्छता, संवर्धन आणि सौंदर्यीकरण यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. पर्यटनाला चालना मिळावी, पर्यटकांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ व्हावी तसेच शहराची स्वच्छ व सकारात्मक प्रतिमा निर्माण व्हावी, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेने नागरिक व पर्यटकांना किल्ला परिसरात प्लास्टिक अथवा इतर कचरा टाकू नये, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखावी आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.